# महाराष्ट्र विधानपरिषद

## पत्रक भाग दोन

### गुरुवार, दिनांक १७ नोव्हेंबर, २०१६/ कार्तिक २६, शके, १९३८

**१४९. लक्षवेधी सूचना स्वीकारण्याबाबत सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, :-**

**(१) महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सोमवार, दिनांक ५ डिसेंबर, २०१६ पासून विधान भवन, नागपूर येथे सुरु होणाऱ्या सन २०१६ च्या अधिवेशनासाठी द्यावयाच्या लक्षवेधी सूचना ONLINE पध्दतीने दिनांक २९ नोव्हेंबर, २०१६ पासून सकाळी ११.०० वा. ते सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंन्त स्वीकारण्यात येतील. तसेच OFFLINE द्वारे प्राप्त होणाऱ्या लक्षवेधी सूचना दिनांक २९ नोव्हेंबर, २०१६ पासून सकाळी ११.०० वा. ते सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंन्त आवक कक्षात स्वीकारण्यात येतील.**

**(२) सन्माननीय सदस्यांनी ONLINE पध्दतीने लक्षवेधी सूचना दिली असल्यास पुन्हा त्याच विषयाची सूचना त्या सदस्याने नव्याने OFFLINE पध्दतीने देण्याची आवश्यकता नाही.**

**(३) ज्या लक्षवेधी सूचना ONLINE पध्दतीने या सचिवालयास प्राप्त होतील त्या सूचनांना प्रथम प्राधान्य देण्यात येणार असून संगणक प्रणालीद्वारे त्या सूचनांना प्रथम नोंदणी क्रमांक दिला जाईल. तसेच, ONLINE पध्दतीने लक्षवेधी सूचना स्वीकारण्याची त्या दिवसाची वेळ समाप्त झाल्यानंतर त्याच दिवशी ज्या सूचना OFFLINE पध्दतीने प्राप्त होतील, त्या सूचना टंकलिखित करुन त्यांना नंतरचे नोंदणी क्रमांक देण्यात येतील.**

**(४) महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अन्वये लक्षवेधी सूचनेचा विषय हा निकडीचा, सार्वजनिक महत्वाचा, स्पष्ट, मुद्देसूद व एकाच विभागाशी संबंधित असणे आवश्यक आहे.**

(५) **OFFLINE** पध्दतीने लक्षवेधी सूचना देताना सदस्यांनी त्या आपल्या **लेटरहेडवर ३** प्रतीत सादर कराव्यात तसेच लक्षवेधी सूचनेचा विषय ज्या विभागाशी संबंधित आहे त्या विभागाचे नाव स्पष्टपणे दर्शविण्यात यावे.

(६) **OFFLINE** पध्दतीच्या लक्षवेधी सूचनेवर एका पेक्षा जास्त सदस्यांच्या स्वाक्षऱ्या असतील तर कृपया स्वाक्षरीच्या खाली सदस्यांनी आपले नाव व नावांचा क्रम स्पष्टपणे नमूद करावा.

(७) **OFFLINE** पध्दतीने लक्षवेधी सूचना या सदस्य किंवा सदस्यांचे अधिकृत स्वीय सहायक अथवा संबंधित विधिमंडळ पक्ष कार्यालयातील अधिकृत ओळखपत्र असलेल्या कर्मचाऱ्यांकडून स्वीकारण्यात येतील. अन्य खाजगी व्यक्तीमार्फत सदस्यांनी पाठविलेल्या सूचना तसेच सन्माननीय सदस्यांच्या लेटरहेडवर दिलेल्या सूचनांव्यतिरिक्त अन्य कोणत्याही स्वरुपातील लक्षवेधी सूचना स्वीकरण्यात येणार नाहीत व विचारात देखील घेतल्या जाणार नाहीत याची कृपया सर्व सन्माननीय सदस्यांनी नोंद घेऊन आवश्यक सहकार्य करावे.

कृ.मा.प...

(८) **OFFLINE** पध्दतीने लक्षवेधी सूचना सादर करण्याच्या पहिल्या दिवशी सूचना देण्याच्या विहित वेळेवर, विधान भवन, नागपूर येथे येणारे सन्माननीय सदस्य, तसेच त्यांचे स्वीय सहायक हे ज्या क्रमाने विधान भवन इमारतीच्या मुख्य प्रवेशद्वारापाशी हजर होतील, त्याच क्रमाने त्यांनी तेथे नियुक्त असलेल्या या सचिवालयाच्या सुरक्षा अधिकाऱ्यांकडून टोकन क्रमांक घ्यावेत व हे टोकन क्रमांक त्यांनी त्यांच्या सादर करावयाच्या लक्षवेधी सूचनांसमवेत या सचिवालयाच्या आवक - टपाल कक्षातील कर्मचाऱ्यांकडे सादर करावेत. तसेच **OFFLINE** पध्दतीने लक्षवेधी सूचना देताना लक्षवेधी सूचनेची **Unicode font** असलेली वर्ड फाईल **पेनड्राईवमध्ये "ई-२" कक्षामध्ये** किंवा **e2.council.mls@gmail.com** या ई-मेल आयडीवर उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

(९) **अधिवेशन संस्थगित होण्यापूर्वीचे कार्यालयीन कामकाजाचे पूर्ण ३ दिवस अगोदरचा दिवस हा ONLINE व OFFLINE पध्दतीने लक्षवेधी सूचना स्विकारण्यासाठी अंतिम दिवस असेल**.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १७ नोव्हेंबर, २०१६.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद

<u>**प्रती :-**</u>

(१) महाराष्ट्र विधानरिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य
(२) मा.सभापती व मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव / खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
(३) मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
(४) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी.
(५) मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
(६) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालय.
(७) मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
(८) संगणक कक्ष **(WEBSITE)**
(९) एम.के.सी.एल कक्ष **(MKCL)**